# परिशिष्ट – १

## अभ्यासासाठी दिलेल्या प्रश्नांचे उत्तर

### सर्व समर्थ देव अस्तित्वात आहे काय?

*(पाठ १ चे प्रश्न पान क्र. 11 वर दिले आहेत)*

१. सर्व विचारपूर्वक प्रश्न जो कोणी विचारू शकतो, तो हा आहे की, काय परमेश्वराचे अस्तित्व आहे?

२. प्रश्न ''परमेश्वराचे अस्तित्व आहे काय?'' वैचारिक आहे कारण या प्रश्नाचे उत्तर आम्ही कसे देतो, ते जीवनाबद्दलच्या आमच्या दुसऱ्या सर्व प्रश्नांना प्रभावित करू शकतो.

३. पवित्रशास्त्र, 'परमेश्वराबद्दलच्या पुष्टीसोबत सुरूवात होत आहे'.

४. पहिले प्रमाण, जे आम्हाला परमेश्वरावर विश्वास ठेवण्यास विवश करते, तो म्हणजे जगाच्या अस्तित्वाचे प्रमाण आहे पृथ्वी व सृष्टी विलक्षण पध्दतीने त्यांच्या अस्तित्वांची घोषणा करते.

५. जर मनुष्याच्या अस्तित्वात परमेश्वराच्या विशेषणाचे लक्षण नाही आहे, तर मग १) जीवनाचा उगम २) नैसर्गिक नियमांचे अस्तित्व व ३) कुटुंबाच्या अस्तित्वाची व्याख्या आपण करूच शकत नाही.

### पवित्र शास्त्र, देवाचे वचन

*(पाठ २ चे प्रश्न पान क्र. 23 वर दिले आहेत)*

१. ग्रीक वाक्यांशाचा अनुवाद ''परमेश्वराची प्रेरणा'' चा मूळ अर्थ परमेश्वराच्या श्वासापासून आहे. उत्तेजनांनी भरलेले जागतिक लेखकांना प्रेरणेपासून लिहिणारे असे म्हटले जात आहे, परंतु पवित्र शास्त्र दावा करते की याच्या प्रेरणेचा उगम स्वत: परमेश्वर आहे.

२. पवित्र शास्त्राला नष्ट करण्याच्या आपल्या प्रयत्नामध्ये डियोक्लेशियन हा असफल राहिला. खरे तर, शंभर वर्षांनंतर जेव्हा पुन्हा एक रोमी सम्राटाने घोषणा केली होती की, नवीन करार तो नवीन रूपात तयार करू इच्छितो, तेव्हा चोवीस तासांच्या आतमध्ये त्याला नवीन कराराच्या पन्नास प्रति प्रस्तुत करण्यात आल्या.

३. त्यावेळेस लिहिल्या गेलेली, शारीरिक स्वच्छता व सुदृढता या विषयावर मनुष्यास कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती, परंतु मोशेने लिहिलेल्या पुस्तकात आधुनिक विचारसरणीचा उल्लेख आढळतो. जर शास्त्रांद्वारा लिहिल्या गेलेल्या तीन हजार वर्षापूर्वी जीवजंतूचा शोध परंतु लेवीय व १३:४५ मध्ये रोगांना दूर करण्यासाठी, मदत करण्यासाठीचे सूचना दिल्या गेल्या आहेत.

४. पवित्र शास्त्र – साहित्यातील प्रत्येक ज्ञात विषयाची माहिती सामील करते आणि दोन हजार वर्षाच्या काळात चाळीसपेक्षा अधिक लेखकांद्वारे लिहिलेल्या लिखाणातून संपूर्ण एकतेचे प्रदर्शन होते.

५. पवित्र शास्त्राचा विषय एक मानव अर्थातच येशू ख्रिस्ताची गोष्ट हा आहे.

६. पवित्र शास्त्राने मानवतेवर अन्य कोणत्याही पुस्तकापेक्षा अधिक प्रभाव पाडला आहे. त्याने इतिहासाच्या प्रवाहाला बदलून टाकले. मोठया साम्राज्यांना स्थापिले आणि ज्यांनी त्यातील उपदेशांचे पालन केले त्यांना आशीर्वाद व सफलता प्राप्त झाली.

७. पवित्र शास्त्र आपल्या वाचकांना एक सार्वकालिक जीवनाची आशा व भरवसा देत आहे आणि जेव्हा आपला एखादी प्रिय व्यक्ती आपणामधून मरण पावते त्याला एक सांत्वना प्राप्त करून देते.

८. परमेश्वराच्या वचनांची अद्भूतत:, त्याची प्राचीनता, त्याची आधुनिकता त्याची विविधता, त्याची एकता, त्याचा विषय, त्याचा प्रभाव आणि हयाची सांत्वना जुडलेली आहे.

## देव पिता कोण आहे?

*(पाठ ३ चे प्रश्न पान क्र. 38 वर दिले आहेत)*

१. केवळ एकच सत्य व जिवंत परमेश्वर आहे. त्याने सृष्टीची निर्मिती केली आणि केवळ तोच सार्वकालिक, सर्वशक्तिशाली, सर्व जाणीव आणि सर्व ठिकाणी उपस्थित आहे.

२. जुन्या करारातील देवत्वाची धारणा, उत्पत्ति १:२६, उत्पत्ति ३:२२, उत्पत्ति ११:७, आणि यशया ६:८ या वचनांमध्ये पाहावयास मिळते.
३. येशूचा बाप्तिस्मा, मणुष्याला पापापासून मुक्त करण्याचे काम, प्रार्थना आणि प्रभूच्या मोठया आज्ञेचा बाप्तिस्मा, पिता, पुत्र व पवित्र आत्म्याच्या एकत्रित काम करण्याचे उदाहरण दाखवते.
४. मनुष्यासाठी देवाजवळ जाण्यासाठी एक मात्र मार्ग, येशू ख्रिस्ताव्दारे येणेच आहे. कारण तो एकच देव आणि मनुष्याच्यामध्ये प्रामाणिक मध्यस्थी करणारा आहे.
५. योहान.१४:६ आणि पहिले तीमथी २:५ मध्ये शिकवते की, परमेश्वराजवळ पोहचण्यासाठी देवदूतांची किंवा संताची किंवा इतर कोणतेही लोक (जिवंत किंवा मृत) यांची गरज नाही. देवापर्यंत पोहचण्यासाठी केवळ एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे फक्त येशूक्ष्(स्त हाच आहे.
६. येशू ख्रिस्ताला मनुष्यजातीसोबत, त्याच्या संबंधांना प्रतिबिंबित ''मनुष्याचा पुत्र'' म्हटले जाते आणि परमेश्वरासोबत त्याच्या संबंधांबाबत त्याला ''परमेश्वराचा पुत्र'' असे म्हटले जाते.
७. परमेश्वराबद्दल पवित्र शास्त्रात सांगितल्या गेल्याप्रमाणे काही तथ्ये ही आहेत. (१) पिता, पुत्र व पवित्र आत्मा अस्तित्वात आहे. (२) या तिन्हीपासून एक महिमायुक्त परमेश्वरत्व तयार होते. (३) ते एकत्र आहेत व एक होऊन अस्तित्वात आहेत. (४) ते सार्वकालिक विलक्षण व निर्मित वस्तूंपेक्षा वेगळे आहेत. (५) ते इच्छा व उद्देशाबाबत एकच आहेत.
८. सत्ये या तथ्यांवर टिकलेली आहेत की परमेश्वराने सर्व वस्तूंची निर्मिती केली. (१) सर्व वास्तविक गोष्टींच्या मागे तोच आहे. (२) तो सर्व काळ टिकणारा आहे. (३) तो सर्वशक्तिशाली आहे. (४) तो सर्व ज्ञानी आहे. (५) तो सर्व स्थळी उपस्थित आहे. (६) तोच केवळ सत्य व जिवंत परमेश्वर आहे.
९. आम्हाला कलस्सैकरांस पत्र १:१६,१७ मध्ये कळते की, सर्व वस्तूंना एकत्र बांधून परमेश्वर जगात सतत काम करीत असतो. तर्क आणि निरीक्षणावरून माहीत होते की, एक सर्वशक्तिशाली हात पृथ्वीच्या नैसर्गिक नियमांना चालवतो. तो पृथ्वी व त्यावरील लोकांना निरंतर अखंड हवा, पाणी आणि सूर्याचा प्रकाश देत राहतो.
१०. येशू ख्रिस्ताच्या द्वारे परमेश्वराचे खरे न्यायपण, व्यक्तिशः, स्पष्टपणे आणि विश्वव्यापी होईल.

## येशू,परमेश्वराचा पुत्र

*(पाठ ४ चे प्रश्न पान क्र. 45 वर दिले आहेत)*

१. ख्रिस्तीपणाच्या आधार हे एक सत्य आहे की येशू क्ष्(स्त हा परमेश्वराचा पुत्र आहे.

२. येशूच्या जन्माची भविष्यवार्ता करण्यात आली होती, ज्यामध्ये त्याच्या वंशावळीच्या काही स्पष्ट गोष्टी सामील आहेत. त्याच्या जन्मस्थळाबद्दल व कोणकोणत्या प्रकारे जन्म घेईल याबद्दल भविष्यवाणी वर्तवण्यात आली भविष्यवाद्यांनी त्याचे ख्रिस्त देशात जाण्याबद्दल आणि त्याच्या जन्म वेळी लहान बालकांची कत्तल यांची पूर्वसूचना दिली होती. भविष्यवाद्यांनी मागील प्रांतातील त्याचे जीवन, येरूशलेमेत विजयी प्रवेश, त्याचे अदयादूत आणि त्याच्या कामाबद्दल सांगण्यात आले होते. त्याची सेवा, दृष्टांताद्वारे त्याचे शिक्षण देणे, अन्य जातीमध्ये त्याचे विशेष कार्य आणि यहुदयांद्वारे त्याला नाकारणे या सर्व भविष्यवाण्या करण्यात आल्या. भविष्यवाणी मध्ये त्याला पकडून देणे आणि त्याचा मृत्यूयाबद्दल सविस्तर चित्रण करण्यात आले मृत्यूसमयी, त्याच्या वाक्यांचा, त्याला पुरण्याबाबत, पुनरूत्थान त्याचे स्वर्गारोहण, या सर्व सूचना पूर्वीच लिहिल्या गेल्या होत्या. भकारण त्याने जुन्या करारातील भविष्यवाण्या पूर्ण केल्या पाठ क्र.४ वर पहा.

३. येशूच्या जीवनासंबंधित भविष्यवाण्यांचे पूर्ण होणेच हे दाखवते की येशू दैवी होता आणि ज्या लोकांनी पवित्र शास्त्रा चे लिखाण केले. त्यांना पवित्र आत्म्याची प्रेरणा होती.

४. येशूने अब्राहमाच्या पूर्वी अस्तित्वात असण्याचा दावा केला, आणि म्हटले की सृष्टीच्या निर्मितीपूर्वी तो परमेश्वर पित्यासोबत होता. तो म्हणाला की तो स्वर्गातून उतरला व पृथ्वीवरील सर्व अधिकार त्याला देण्यात आले.

५. येशूने म्हटले की, तो जगाचा प्रकाश आहे, मग त्याने आंधळयांना दृष्टी दिली त्याने स्वत:ला जीवनाची भाकर संबोधले आणि त्याने पाच हजार लोकांना जेवू घातले. त्याने पुनरूत्थान व जीवन होण्याचा दावा केला आणि लाझारसाला मरणातून जिवंत केले.

६. येशूच्या चांगुलपणाला पिलाताच्या पत्नीद्वारे हेरोदाद्वारे वधस्तंभावर चोराद्वारे आणि एवढेच नाही तर त्याचा शिष्य यहुदाद्वारा ओळखला गेला.

७. प्रभूचा दिवस, प्रभु भोजन, बाप्तिस्मा, आणि आमच्या कॅलेंडरवरील तिघींची निश्चितता आमच्या आजच्या जगतावर येशूचा असर असल्याचे प्रमाण आहे.

## पवित्र आत्मा कोण आहे?

*(पाठ ५ चे प्रश्न पान क्र. 54 वर दिले आहेत)*

१. प्रश्न ''काय?'' च्या ऐवजी कोण आहे? कारण पवित्र आत्मा एक जीव आहे एक दैवी व्यक्ती आहे ज्याचे स्वत:चे व्यक्तिमत्त्व आहे.

२. पवित्र आत्मा न्याय, मन, इच्छा ज्ञान आणि भावनांना दाखवतो जे हे प्रदर्शित करते की, ती केवळ एक शक्ती नसून एक जिवंत व्यक्ती आहे.

३. सामान्यपणे शक्ती किंवा बळ सोबत दुर्व्यवहाराला कविता किंवा प्रतीकात्मक संदर्भाला सोडून दु:खी झाला अपमानित झाला किंवा तहानलेला झाला. अशा शब्दांचे वर्णन केले जात नाही. या वाक्यांच्या संदर्भावरून, भाषा कवितेची आहे की रूपकात्मक आहे हे कळत नाही. जर पवित्र आत्म्याला कोणी दु:खी किंवा अपमानित करत असेल तर तो निश्‍चितच एक व्यक्ती आहे.

४. पवित्र आत्मा, पिता व पुत्रासोबत सार्वकालिक गुणांचा भागीदार आहे. सर्वज्ञानी आहे, सर्वात शक्तिशाली आहे आणि सर्व स्थळी उपस्थित आहे पिता व पुत्राप्रमाणेच आत्म्याजवळसुध्दा निर्मिती शक्ती आहे.

## देव मानव झाला

*(पाठ ६ चे प्रश्न पान क्र. 63 वर दिले आहेत)*

१. नवीन करारातील पहिल्या चार पुस्तकांत अर्थात शुभवर्तमानांत स्पष्ट करते की, परमेश्‍वर हा कसा मानव आहे.

२. येशूचा जन्म होणे, ही त्याची सुरूवात नव्हे तर तो सृष्टीच्या अस्तित्वापूर्वी पित्याच्या महिमाचा भागीदार होता.

३. योहान.१:१—५ खालील चार महान सत्ये शिकवते. १) येशू निर्मिती नव्हतो. २) देवाने सृष्टीची निर्मिती येशूच्या द्वारे केली. ३) येशू जिवंतांना जीवन देतो. ४) येशू हा जीवनाचा व मृत्यूचा (मरणाचा) मालक आहे.

४. येशू (१) स्वर्ग सोडून, (२) मनुष्य बनून, (३) मनुष्याची सेवा करून, (४) मरणापर्यंत समर्पण करण्यासाठी पृथ्वीवर आला.

५. हे तथ्य आहे की, परमेश्‍वर मनुष्य झाला, क्ष्(स्तीपणाचा केंद्रबिंदू सत्य आहे.

६. येशूचा जन्म अदभुत होता कारण तो एका कुमारिकेपासून जन्मास आला.

७. आपण कधीही विसरता कामा नये की, येशू (१) परमेश्‍वर होता, आणि आहे (२) मनुष्य झाला आणि (३) परेमश्‍वर मनुष्याच्या रूपात पृथ्वीवर आला.

८. येशू परमेश्वर होता कारण त्याचे मानव होणे मनुष्याला एक मुंगी होण्याच्या किती तरी पट रिक्त होणे होते.

## येशूला आम्ही कसे पाहावे?

*(पाठ क्र. ७ चे प्रश्न पान क्र. 73 वर दिले आहेत)*

१. उध्दारकर्ता शब्द त्या व्यक्तीसाठी उपयोगात आणतात. जो दुसऱ्यांना अधिकाहून अधिक धोक्यांपासून वाचवतो.

२. येशू हा एक अदभुत उध्दारकर्ता आहे. कारण तो आम्हाला आपल्या पापापासून वाचवतो, आमचा आध्यात्मिक उध्दारकर्ता आहे.

३. ख्रिस्ताचा अर्थ आहे परमेश्वरापासून अभिषेक पावलेला किंवा निवडलेला.

४. आम्हाला माहीत आहे की येशू देवाचा (परमेश्वराचा) पुत्र आहे. कारण त्याच्या बाप्तिस्म्याच्या वेळेस परमेश्वराने स्वर्गातून तो आपला पुत्र आहे अशी घोषणा केली. योहान जो येशूचा शिष्य त्याने म्हटले की, आम्हाला तीन लोक साक्षरूपाने दिले गेले आहेत ते म्हणजे आत्मा, पाणी आणि रक्ताची.

५. पवित्र आत्मा, पाणी आणि रक्त बोलून सांगून प्रेषित येशूच्या जीवनातील घटनांकडे सूचित करत आहे. जेव्हा त्याने पाण्यातून बाप्तिस्मा घेतला होता, तेव्हा पवित्र आत्मा त्याच्यावर स्वर्गातून उतरला आणि रक्त त्याच्या मृत्यूच्या आजूबाजूच्या सर्व घटनांकडे संकेत करते.

६. पेत्राने आपल्या ऐकणाऱ्यांना, येशूला आपला तारणारा व क्ष(स्ताच्या रूपात स्वीकारण्याकरिता आपणांस चालना देतो. (प्रे.कृ.२:३६)

७. जर येशू, ख्रिस्त आहे (आणि तो आहेच) तर आम्हाला त्याच्या शिकवणीवर समर्पण केले पाहिजे आणि आपल्या जीवनात त्याला प्रथम स्थान दिले पाहिजे.

## येशू पृथ्वीवर का आला?

*(पाठ ८ चे प्रश्न पान क्र. 82 वर दिले आहेत)*

१. मानवाच्या इतिहासामध्ये प्रभू येशूचे पृथ्वीवर येणे, ही सर्वात मोठी घटना मानली जाते, आपला उध्दार, त्याचे वधस्तंभावर मरण होण्याने अवलंबून होता.

२. येशू संपूर्ण मानव तसेच संपूर्ण परमेश्वर होता.

३. येशू पूर्णपणे ईश्वरीय व पूर्णपणे मनुष्य होता.

४. आपला प्रभू हा स्वत:ची सेवा, मृत्यू व पुनरूत्थानाद्वारे लोकांना बोलावण्यासाठी

आला, ज्यांना त्याने आपली मंडळी म्हणून ओळखले होते.

५. येशूने आपल्या बारा शिष्यांची निवड केली, आणि व्यक्तिश: शिक्षण दिले, परंतु हे स्पष्ट आहे की, त्यांना तो त्या कामासाठी शिक्षण देत होता, जे त्यांच्या शिष्यांना तो स्वर्गात गेल्यावर पृथ्वीवर करावयाचे होते.

६. नव्या करारातील पत्रे आम्हास दाखवतात की, त्याचे आत्मिक शरीर बनून ख्रिस्ताच्या जीवनाचे उत्तर कसे द्यावे.

७. नाही त्याची मंडळी बनल्याशिवाय आपण येशूच्या जीवनाबद्दल खरे उत्तर देऊ शकत नाही.

८. त्याची मंडळी बनण्यातून जगल्याशिवाय आपण या जगात येशूच्या उद्देशाला पूर्ण करू शकत नाही.

## वधस्तंभ आणि मंडळी

*(पाठ क्र. ९ चे प्रश्न पान क्र. 93 वर दिले आहेत)*

१. पवित्र शास्त्राचा गोष्टींचा सारांश परमेश्वराच्या पुत्राच्या जीवनाचे बलिदान आहे, जे त्याने मानवाजातीसाठी वधस्तंभावर अर्पण केले.

२. ख्रिस्तीपणाचा आधार, पापासाठी एक दैवी जीवदान देण्यात येते आणि त्या जीवनाचा मृत्यूमधून उठणे आहे.

३. मंडळीरहित ख्रिस्तीपणाचे अस्तित्व असू शकत नाही. कारण कोणतेच डोके (मस्तक) शरीराशिवाय काम करू शकत नाही, ना ही कोणते शरीर डोक्याविना काम करू शकते.

४. वधस्तंभ (१) मंडळीची स्थापना (रचना) करते (२) मंडळीचे शुध्दीकरण करते (३) मंडळींला काम करण्यास भाग पाडते किंवा क्रियाशील बनवते.

५. ख्रिस्ताच्या शरीरावर विश्वास (रोम.१०:१०) पापापासून दूर जाणे (प्रे.कृ.११:१८) ख्रिस्ताला परमेश्वराच्या पुत्राच्या स्वरूपात स्वीकार करणे. (रोम.१०:१०) ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेणे (गलती.३:२७) च्या द्वारे होऊ शकतो.

६. येशू आम्हाला क्षमेसाठी व जीवनासाठी आमंत्रित करतो.

७. येशूचे शरीर मंडळी आहे.

## ''मंडळी'' काय आहे?

*(पाठ १० चे प्रश्न पान क्र. 101 वर दिले आहेत)*

१. पवित्र आत्म्याद्वारे शब्दांची फोड होणे अत्यंत निर्णयमुक्त आहे. येशू व प्रेषितांद्वारे उपयोगात आणलेले शब्दार्थ, उदाहरणे आणि विचारांची रूपे, बघण्यासाठी आम्हाला पवित्र शास्त्राच्या अभ्यासाचे इच्छुक असणे आवश्यक आहे. (पाठ क्र. १० आणि परिशिष्ठ ३ बघावे)

२. ''मंडळी'' शब्द त्या लोकांच्या शरीराकडे सूचित करत आहे, ज्यांनी ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाची आज्ञा पाळली आहे आणि ज्यांना ख्रिस्तांच्या रक्ताने मुक्ती दिली आहे, हे शरीर एका ठिकाणी ख्रिस्तीजनांची स्थानिक सभेच्या रूपात मंडळी आहे आणि त्याला संपूर्ण जगातील मुक्ती पावलेल्या लोकांसाठी उपयोगात आणले जाऊ शकते.

३. हे सत्य आहे की मंडळी परमेश्वराचे मंदिर आहे, याचा अर्थ असा की, परमेश्वर आपल्या विश्वासना–यांमध्ये वास करतो, या कारणामुळे आपण अशा प्रकारे जगणे, काम करणे आणि आराधना केली पाहिजे ज्यामध्ये दिसेल की परमेश्वर खरोखरच आमच्यामध्ये वास करतो.

४. ख्रिस्ताचे लोक एक जिवंत वास्तू म्हणजेच मंडळी अशी असते. प्रत्येक क्ष(स्ती मनुष्याने अखंड प्रगतिशील असले पाहिजे.

५. ख्रिस्त मंडळीचे मस्तक त्याचप्रमाणे आहे, ज्याप्रमाणे एका स्त्रीचे पुरूष क्ष(स्त आपल्या मंडळीवर प्रीती करतो. जसे पती आपल्या पत्नीवर प्रेम करतो.

६. कोणी ख्रिस्ताच्या मंडळीत विश्वास ठेवणे, पश्चात्ताप करणे, येशूला स्वीकारणे आणि बाप्तिस्मा घेण्याद्वारे प्रवेश करतात. उध्दाराद्वारे प्रत्येक व्यक्तीला परमेश्वर आपल्या मंडळीत मिळवितो.

७. मंडळी ख्रिस्ताचे नाव धारण करते, त्याच्या स्तुती आराधनेसाठी एकत्र येतात आणि जगात त्याच्यासाठी काम करते. देवाचा पवित्र आत्मा क्ष(स्ती लोकांत वसती करतो.

## आतापर्यंत सांगितल्या जाणा–या सर्वश्रेष्ठ कहानीपासून पुढे

*(पाठ क्र ११ चे प्रश्न पान क्र. 120 वर दिले आहेत)*

१. मंडळी प्रभूद्वारे दिल्या गेलेली मोठया आज्ञेचे पूर्ण होणे आहे, (मत्तय.२८:२०) आणि पृथ्वीवर ख्रिस्ताचे शरीर आहे.

२. प्रे.कृ.२:१ सर्वनाम प्रे.कृ.१:२६ मध्ये त्या अकरा प्रेषितांना सूचित करते. पवित्र शास्त्र अशी कोणतीही सूचना देत नाही की पेंटेकॉस्टच्या दिवशी शिष्यांव्यतिरिक्त कोणालाही पवित्र आत्म्याचा बाप्तिस्म्या मिळाला असेल.

३. प्रेषितांचा पवित्र आत्म्यापासून बाप्तिस्मा त्यांना परमेश्वराच्या संदेशाला प्रकट करून त्या योग्य बनवण्यासाठी ही पृष्टी करण्यासाठी की तो संदेश परमेश्वरापासून होता आणि दुसऱ्या क्ष(स्तीजनांपर्यंत चमत्कारिक दान पोहचण्यासाठी दिला गेला होता.

४. प्रेषितांच्या पवित्र आत्म्यामध्ये बाप्तिस्मा ही पुष्टी करतो की नवीन करार आम्हाला आत्म्याची प्रेरणा पावलेल्या लोकांच्या द्वारे दिला गेला.

५. ख्रिस्ताचे परमेश्वराकडून असण्याच्या कारणावरून पेत्राने त्याच्या चमत्काराबद्दल त्याच्या पुनरूत्थानाबद्दल भविष्यवाण्यापूर्वी होण्याबद्दल साक्षीचे पुरावे आणि पवित्र आत्म्याचे त्यावर उतरणे याबद्दल सांगतो.

६. पापांपासून मुक्ती ही परमेश्वराच्या योजनेसाठी ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाविषयी विशेष महत्त्व आहे. जर तो मृतातून जिवंत झाला नसता तर क्ष(स्ताला परमेश्वराचा दैवी पुत्र मानल्या गेले नसते.

७. पापांमध्ये नाश होण्यासारखे कोणती दु:खद घटना नाही आहे.

८. उध्दारासाठी ज्या अटी आहेत त्यासंबंधी मार्क.१६:१५,१६ विश्वासासंबंधी; लूक.२४:४६,४७, पश्चात्तापासंबंधी आणि पापांच्या क्षमतेसंबंधी मत्तय २८:१८—२०, मध्ये बाप्तिस्म्यावर विशेष भार दिला जातो.

९. प्रे.कृ.२२:१६, प्रे.कृ.२:३८ यांना मिळून पुरावा मिळतो की बाप्तिस्मा पापांच्या क्षमेसाठी आहे.

## नवीन करारातील मंडळी

*(पाठ क्र. १२ चे प्रश्न पान क्र. 132 वर दिले आहेत)*

१. ''प्रेषितांपासून शिक्षण घेण्यामध्ये अधीन राहा'' चा अर्थ आहे की, आत्म्याची प्रेरणा पावलेल्या प्रेषितांनी ज्यांना शिक्षण दिले होते त्यावर त्यांनी खरेपणाने चालावे, परमेश्वराच्या वचनांच्या प्रति, ख्रिस्तीजनांची अशीच वचनबध्दता असली पाहिजे.

२. यरूशलेममधील मंडळी, मनाने, हृदयाने व शिक्षणाची एकी यांचे सहभागी होते.

३. आजच्या मंडळीला, कृपेच्या व आज्ञाधारक रीतीने चिन्हे देऊन परमेश्वराच्या वचनांशी प्रतिबध्द असावे, प्रत्येक व्यक्तीला, ज्याने सुरूवातीची आज्ञा पाळली आहे. येशू ख्रिस्तासोबत व मंडळीच्या दुसऱ्या सदस्यासोबत एकत्र बनवले गेले. ख्रिस्ती लोक हृदयाने (मनाने) व जीवनाने एक कुटुंब आहे.

४. हे निर्णायक आहे की, नवीन करारातील अशी कोणती मंडळी जी परमेश्वरासाठी आपल्या दैनंदिन जीवनात, आपल्या आध्यात्मिक ओळखीत आपल्या स्तुती आराधनेत आणि आपल्या आत्मिक सेवेला प्रभावित करील.

५. प्रेषितांची कृत्ये २:४१—४७; ५:११; ७:३८; आणि ८:१,३ स्पष्ट करते की, नवीन कराराची मंडळीचा उगम पेंटेकॉस्टच्या दिवशी झाला.

६. परमेश्वराच्या वचनांचा मुख्य विरोध दुसऱ्या शतकाच्या इसवी सनामध्ये आरंभ झाला. सातव्या शतकामध्ये कॅथॉलिक मंडळीसोबत पोप आणि कठीण संदेष्टे तंत्राचा उदय झाल्याने वचनाचा विरोध आपल्या शिखरावर होता. दुसरे डिनॉमिनेशन (पंथ) सोळाव्या शतकात आस्तित्वात येऊ लागल्या.

७. स्थानिक ख्रिस्तीजनांपासून ख्रिस्ताचे शरीर (मंडळी) वाढत गेले.

८. नवीन करारात स्पष्ट केलेली नावे त्यांच्याव्यतिरिक्त कोणतेही दुसरे नाव नवीन करारातील मंडळयाची ओळख म्हणून झाली नसती.

९. होय आपण ख्रिस्ती लोकांनी नवीन करारातील त्याच रितिरिवाजांच्या (पध्दतीचा) आचरणात आणले पाहिजे, जे परमेश्वराच्या आज्ञेनुसार स्थापित झाली आहे.

## देवाच्या लोकांसाठी विशेष शब्द

*(पाठ क्र. १३ चे प्रश्न पान क्र. 145 वर दिले आहेत)*

१. परमेश्वर इस्त्रायलाचा राज्यकर्ता, सरकारचा मुख्य व त्यांच्या धर्माचा प्रमुख इस्त्रायल एक धर्म संचालित देश (परमेश्वरशासित देश) होता.

२. राजा शौलला परमेश्वराचा (यहोवाचा) सेवक व्हायचे होते त्याचा अधिकार मोशेच्या व्यवस्थापनेपर्यंत सीमित होता.

३. दानिएलच्या भविष्यवाणीनुसार येणारे नवीन राज्य एक विशिष्ट होणारे होते एक अनंत राज्य हे दुसऱ्या सर्व राष्ट्रांपेक्षा वेगळे असणारे होते.

४. पवित्र आत्म्याच्या पुढाकाराने ''राज्य'' शब्दाचे स्थान शेवटपर्यंत मंडळी या शब्दासाठी आला. या शब्दाचा उपयोग दाखवते की आपल्या लोकांच्या

हृदयावर ख्रिस्ताची राज्य करण्याची भूमिका कोणत्या प्रकारे मंडळीला तयार करते.

५. पौल परमेश्वराच्या राज्यात होता, परंतु तो स्वर्गाच्या राज्यात प्रवेशाची वाट पाहत होता. खरे सत्य ख्रिस्ती आज आध्यात्मिक शिक्षणाच्या अधीन आहेत. परंतु ते सदासर्वदा परमेश्वरासोबत ख्रिस्तासोबत आणि पवित्र आत्म्यासोबत भरपूर आणि जवळच्या संबंधात प्रवेश करतील.

६. नवीन करारात मंडळी या शब्दाचा उपयोग ११४ वेळा झाला आहे. नवीन करारात या शब्दाला समजल्याशिवाय आपण ख्रिस्ताच्या उध्दाराच्या मार्गाला समजू शकत नाही (बघा परिशिष्ट – ३).

७. मंडळीचा साधारण अर्थ सभा असा होतो, जसे प्रेषितांची कृत्ये १९:२५ मध्ये सांगितली आहेत.

८. नवीन करारातील मंडळी शब्दाचा अर्थ प्रत्येक वेळेस धार्मिक व बोलावण्यात आलेली सभा असाच नाही आहे.

## मंडळीसाठी दैवी पदनामे

*(पाठ १४ चे प्रश्न पान क्र. 157 वर दिले आहे)*

१. येशू राजा (मस्तक) आहे, आणि मंडळीचे सभासद त्याच्या आत्मिक राज्याचे नागरिक आहोत.

२. ख्रिस्ताने मंडळीची स्थापना केली तिला विकत घेतले, तो तिचा मालक आहे, आणि मस्तक बनून तिची सेवा करतो. मंडळीला देवाची मंडळी च्या रूपामध्‍ये सुध्दा पाहिल्या जावू शकते.

३. मंडळीला देवाने विशेष पदनामे दिले होते. ते एका दैवी उद्देशाला पूर्ण करतात, आणि आम्हाला त्याचा उपयोग करावयाला पाहिजे.

४. जेव्हा आपण मंडळीला त्याचप्रमाणे संबोधीत करीतो. जसे बायबल करते तेव्हा आपण स्वत:ला तेच बनण्यासाठी योग्य मार्गावर घेवून येतो, की जे देव आम्हाला बनवू इच्छितो.

५. ख्रिस्ती लोक देवाचे कूटूंब आहे. त्यांच्या मनपरिवर्तनाच्या वेळेस, देव त्यांना आपल्या संतानाच्या रूपामध्ये दत्तक घेवून, त्यांना कुटूंबाचे सर्वअधिकार देतो आणि ख्रिस्ताच्या सोबत सार्वकालीक जीवनाचे वारीस बनवितो.

६. एक ख्रिस्ती ख्रिस्ताचा अनुयायी आहे, जो त्याचप्रकारचे जीवन जगण्याचा

प्रयत्न करीतो, ज्या प्रकारचे जीवन जगण्याचे येशूने आपल्या अनुयायांना शिक्षण दिले.

७. पौलाने म्हटले, कारण जगने हे मला ख्रिस्त, व मरणे हे मला लाभ असे आहे.

८. मनपरिवर्तनाच्या वेळेस, कोण्या एकाला परमेश्वराच्या संतानाच्या रूपामध्ये दत्तक घेतल्या जाते. त्याचा वारसा अनंत होण्याच्या सोबत : सोबत देवाच्या या जगीक कुटूंबाचे समर्थन आणि शक्ती पण आहे.

९. शिष्य हा शब्द नव्या करारात २३८ वेळा आढळतो.

१०. शिष्य तो आहे जो स्वत:ला आपल्यापेक्षा कोण्या मोठयापूढे झुकवितो, आणि त्या मोठयाकडून सदैव शिकत राहतो. तो ऐकणारा, शिकणारा आणि अभ्यास करणारा होतो.

११. पविन्न लोक देवासाठी वेगळे केले आहेत. ख्रिस्ती होवून कोणी पवित्र होवून जातो, वेगळे होवून जातात. पवित्र जनांना पवित्र बोलाविल्याने बोलाविले गेले आहे, ते पवित्र आचरणात जीवन जगतात, आणि शेवटच्या दिवशी देवाच्या समोर पवित्र निष्कलंक आणि निर्दोष हजर होवू इच्छितो (पाहा कलस्सै १:२२).

## ख्रिस्त, मंडळीचे मस्तक

*(पाठ १५ चे प्रश्न पान क्र. 164 वर दिले आहे)*

१. जे नेतृत्व पूढारीपण करीत नाही, ते खरे नेतृत्व नाही.

२. येशू आपल्या कराराच्याव्दारे मंडळीचे पूढारीपण करतो (इफिस.१:२१,२३; कलस्सै.१:१८,१९).

३. ख्रिस्त शेवटच्या समयापर्यन्त मंडळीच्या मस्तकाच्या रूपामध्ये राज्य करेल.

४. येशू पूर्णत्वाचे जीवन जगून आणि देव पित्याच्या आपल्या आज्ञाधरीकतेव्दारे आमचा पूर्णपणे तारणकर्ता बनला.

५. आम्ही तेच बनतो जे आम्ही पाहतो. ख्रिस्ती लोक जीवन व्यतीत करण्याच्या नमुन्याच्या रूपामध्ये ख्रिस्ताच्या जीवनाकडे पाहतात. तो आपल्या पूर्णत्वाच्या जीवनाने सदैव त्यांचे पूढारीपण करीतो.

६. आम्हाला नम्रता आणि सेवेमध्ये ख्रिस्ताच्या उदाहरणाचे अनुकरण करायला पाहिजे.

७. प्रत्येक प्रकाराने एक दुस—याची सेवा करून ख्रिस्ती लोक एक दुस—याचे पाय धुतात.

## मंडळीमध्ये प्रवेश करणे

*(पाठ १६ चे प्रश्न पान क्र. 173 वर दिले आहे)*

१. प्रभूच्या मंडळीचे अमूल्य मोल त्याचे दैवी स्त्रोत, त्याची मौल्यवान कींमत आणि त्याच्या महान गुणामध्ये दाखविल्या गेले आहे.

२. होय, प्रभूव्दारे दिलेल्या आज्ञांच्या अटी आजपण आम्हावर लागू आहेत. हे जगाच्या शेवटपर्यन्त प्रभावीत राहिल (मत्तय.२८:१८—२०).

३. आमचे तारण त्याप्रकारे होवू शकत नाही, जसे वधस्तंभावर चोराचे झाले होते. कारण तो चोर नियमशास्त्राच्या अधिन मेला होता. आता जेव्हा ख्रिस्त आमच्यासाठी मरण पावला आहे, आमच्यासाठी त्याच्याव्दारे दिल्या गेलेल्या आज्ञेला मानने आवश्यक आहे.

४. आज ख्रिस्ताच्या मंडळीचा सदस्य बनण्यासाठी विश्वास करणे, पश्चात्ताप करणे, ख्रिस्ताची कबुली देणे, आणि बाप्तिस्मा घेणे आवश्यक आहे (प्रे.कृ. २:३८,४७).

५. तारण पावलेल्यांना प्रभुच्या मंडळीमध्ये मणूष्य नाही, केवळ देवच मिळवितो.

६. जेव्हा कोणी ख्रिस्ती होण्यासाठी तेच करीतो, जे लोकांनी प्रेषितांच्या पुस्तकामध्ये केले, तेव्हा देव त्यांच्यासाठीपण तेच करेल जे त्याने त्यांच्यासाठी केले. ज्यांनी प्रेषीतांच्या पूस्तकामध्ये त्याच्या इच्छेला पूर्ण केले.

७. ख्रिस्ति होण्यासाठी जे काही प्रेषीत २ मध्ये लोकांनी केले, तेच करून कोणी व्यक्ती शुभवर्तमानाची आज्ञा पाळू शकतो. त्याला खात्री होवू शकते की देवाचे अभिवचने पक्के आहेत.

८. होय, जेव्हा तारणासाठी प्रभुच्या अटींना विकृत केल्या जाते, तेव्हा पूष्कळ नुकसान होते. या अटींना मानल्याशिवाय आणि प्रभुच्या योजनेमध्ये त्याच्या महत्वाला पाहिल्याशिवाय कोणी येशूच्या आज्ञेला गंभीरपणे घेणार नाही.

## मंडळीची एकता

*(पाठ १७ चे प्रश्न पान क्र. 182 वर दिले आहे)*

१. मंडळीची एकता सुखद आहे कारण की, ती क्ष्(स्तामध्ये विश्वास वाढविते. ती चांगली आहे कारण की ख्रिस्ताने तिच्यासाठी प्रार्थना केली.

२. क्रूसावर जाण्याच्यापूर्वी, ख्रिस्ताने विश्वासनाच्या एकतेसाठी प्रार्थना केली.

३. पौलाने येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये ऐकतेचा आग्रह केला.
४. ख्रिस्ती लोक ख्रिस्तासोबत आणि एक दुस—याच्या सोबत, कूटूंबातील सदस्याप्रमाणे एक झाले आहेत.
५. जेव्हा कोणी ख्रिस्तामध्ये बातिस्मा घेतो/घेते, तेव्हा तो इतर ख्रिस्ती लोकासोबत एक होतो/होते.
६. मंडळी शिक्षण आणि विश्वासामध्ये एक आहे, प्रत्येकजण जो ख्रिस्ताच्या शरीरामध्ये प्रवेश करतो, तेव्हा एकता पवित्र आत्म्याच्याव्दारे दिल्या जाते, परंतू त्या एकतेला राखून ठेवण्याच्या रितीला प्रत्येक ख्रिस्ती लोकासाठी बायबलच्या शिक्षणाची आज्ञा मानने आहे.
७. एकता ख्रिस्ताच्या इच्छेच्या प्रती वचनबध्दतेने होते.
८. बायबलची आज्ञा मानण्याची प्रत्येक ख्रिस्ती लोकांच्या उत्सुकतेने शिक्षणामध्ये एकता येते, जेव्हा की दैनंदिन जीवनामध्ये एकता एक दुस—या मधील उत्सुकतेने येते. मंडळीला या दोघांची आवश्यकता आहे.
९. एकता राखण्यासाठी, ख्रिस्ती लोकांना गरज आहे की त्यांनी प्रिती आणि कृपेने भावाकडे तसेच बहीणीकडे लक्ष दयावे. प्रत्येकाने आपले विचार व इच्छांची काळजी न करता, काही पण स्वार्थी भावनेने करू नये.

## सार्वकालीक बक्षिस आणि शिक्षा

*(पाठ १८ चे प्रश्न पान क्र. 197 वर दिले आहे)*

१. देव प्रेमळ, दयाळू आणि सहनशील तर आहे, परंतू तो क्रोध करणारा आणि बदला घेणारा देव पण आहे. देव दयाळू पण आहे आणि कठोरपण आहे.
२. दृष्टांना अनंत काळासाठी नाहीसा न होणारा नियमित शिक्षा मिळेल (प्रकटी. १४:११). म्हणते की, त्यांची पिडा युगानयुग राहील.
३. ज्यांना नर्कामध्ये पाठविल्या जाईल, ते देवा पासुन दूर केल्या जातील, जेथे ते सैतान आणि त्याच्या दुतांसोबत, अग्नी आणि गंधकामध्ये पिडा सहन करतांना, बाहेरच्या अंधारामध्ये देवाकडून बदला घेण्याचे त्रास भोगतील.
४. पौलाने त्या लोकांने वर्णन कठीण आणि पश्चात्ताप न करणारे अंत:करणाच्या लोकांच्या रूपामध्ये केले, जे देवाला ओळखीत नाहीत, आणि सत्याला मानीत नाहीत.
५. आमचा सर्वात मोठा उद्देश स्वर्गामध्ये पोहचणे आणि नर्काच्या भयानकतेपासून

वाचणे असायला पाहिजे.

६. जे लोक जुन्या कराराच्या अधिन होते, त्यांना दिर्घ आयुष्य आणि समृध्दी बरोबर कनानाच्या जमीनीचे अभिवचन दिले होते. ख्रिस्ती लोकांना सर्वदा राहण्यासाठी एक ठिकाण देण्याचे अभिवचन दिल्या गेले आहे.

७. ष्स्वर्गष शब्द तीन विभिन्न क्षेत्रांना संबोधीत करण्यासाठी केल्या जातो; १) आकाश जेथे ढग आहेत आणि पक्ष उडतात; २) तारे आणि नक्षत्रांनी भरलेली सृष्टी आणि; ३) देवाचे निवासस्थान.

८. तेथे सुर्य, चंद्र किंवा कोणताही दिवा नसणार कारण देवच आमचा प्रकाश असेल. आम्हाला शारीरिक जेवणाची गरज नसणार, कारण की, जीवनाच्या झाडापर्यन्त आमची ओळख असेल.

९. जे देवाची इच्छा पूर्ण करतात, ते स्वर्गात जातील.

## पश्चात्ताप

*(पाठ १९ चे प्रश्न पान क्र. 208 वर दिले आहे)*

१. मृत्यूच्यानंतर श्रीमंत माणसाची प्राथमिक गरज बदलली. त्याला त्याच्या आत्म्याची स्थिती आणि त्याच्या भावांच्या आत्मिक स्थितीची चिंता होवू लागली.

२. ष्पश्चात्तापष एक पायाभूत शब्द आहे कारण की केवळ तेच लोक ख्रिस्ती बनू शकतात ज्यांनी पश्चात्ताप केला आहे. वास्तविकपणे ख—या पश्चात्तापानेच सार्वकालीक जीवनाचे दार उघडल्या जाते.

३. यहुदाचा पस्तावा (मत्तय.२७:३) दाखविला आहे की पश्चात्ताप मात्र पस्ताव्यापेक्षा अधिक आहे. यहुदा पस्तावला की त्याने येशूला पकडून दिले होते, परंतू त्याने पश्चात्ताप केला नाही.

४. दैवी दु:ख पहीले होते आणि ते पश्चात्तापाला जन्म देते. दैवी दु:ख प्रक्रीयाचा एक भाग आहे. परंतू हे स्वत:मध्ये पश्चात्ताप करणे नाही.

५. शौलाने इच्छेला दृढतापूर्वक बदलले ज्याने त्याचा पश्चात्ताप स्पष्टपणे दिसला. त्याने ख्रिस्ताच्या मंडळीचा छळ बंद करून आणि आपले संपूर्ण जीवन येशुला समर्पीत केले.

६. पौलाने थेस्सलीनकातील लोकांची प्रशंसा केली कारण की ते आपल्या पश्चात्तापामध्ये मुर्तीपासून देवाकडे वळले अशासाठी की जीवंत आणि

ख–या देवाची सेवा करावी (१ थेस्सलनी.१:९). त्यांनी दाखविले की पश्चात्ताप करणे केवळ पापापासून वळणे नाही, परंतू परमेश्वराकडे वळणे पण आहे.

७. पश्चात्ताप करणे म्हणजे पापांची कबुली पेक्षा अधिक आहे कारण की पापापासून वळून ख्रिस्ताकडे वळणे पण आवश्यक आहे. अनेक लोक विचार करतात की कोण्या व्यक्तिच्या समोर आपल्या पापांची कबुली देणे पश्चात्तापच आहे. आपल्या पापांचा स्विकार करणे आवश्यक आहे (याकोब.५:१६). परंतू पापमय जीवनाला सोडणे पण आवश्यक आहे.

८. देवाचे चांगुलपण, बक्षिसाचे अभिवचन आणि शिक्षेचे भय पवित्र शास्त्राच्या अनुसार पश्चात्ताप करण्यासाठी तीन प्रेरक आहेत.

## तुम्ही येशूबाबत काय कराल?

*(पाठ २० चे प्रश्न पान क्र. 227 वर दिले आहे)*

१. स्वर्गासाठी मार्ग केवळ येशूच आहे. यासाठी त्याला दिलेले आमचे उत्तर नक्की करेल की आम्ही अनंतकाळाचा वेळ कोठे घालवू.

२. शिशु आणि लहान बालकांना बाप्तिस्मा घेण्याची आवश्यकता नाही कारण की त्यांना पाप काय आहे हे समजत नाही.

३. बाप्तिस्मा पापांची क्षमा अर्थात माफीसाठी आहे.

४. नवीन करारातील मंडळीला ओळखण्यासाठी हे विचारा, ‘‘ते नवीन करारातील मंडळी बनण्याचा प्रयत्न करीत आहेत काय?’’; ‘‘ते प्रत्येक रविवारी प्रभूभेजनात भाग घेतात काय?’’; ‘‘ते वाद्याविना गातात काय?’’; ‘‘ते येशूच्या नावामध्ये प्रार्थना करतात काय?’’; ‘‘ते प्रत्येक रविवारी आपल्या मिळकती मधून देतात काय?’’; ‘‘त्यांची रचना कशी आहे?’’; ‘‘पृथ्वीवर त्यांचे कोणते मुख्यालय आहे काय?’’; ‘‘त्यांचे मिशन काय आहे?’’

५. रोम.६:४ शिकविते की बाप्तिस्मा पाण्यामध्ये पूरले जाणे आहे.

६. एका ख्रिस्ती व्यक्तिच्या जीवनाला थोडक्यात सांगण्याची चांगली रीत हे म्हणणे आहे की त्याने क्ष(स्तामध्ये बाप्तिस्मा घेतला आहे आणि तो ख्रिस्ताच्या अनुयायी आहे.

७. एक ख्रिस्ती व्यक्ती देवाच्या बचनाच्या जवळ राहतो यासाठी की तो देवाच्या प्रती ख्रिस्ताच्या ख–या आज्ञाधारीकतेचे अनुसरण करू शकेल.

८. प्रत्येक रविवारी, अर्थात प्रभुच्या दिवशी, ख्रिस्ती लोकगीत गावून, प्रार्थना

करून, देवाच्या वचनाचा अभ्यास करून, प्रभुभोजनामध्ये भाग घेवून आणि आपल्या धनातून देवून देवाची उपासना एकत्र होवून करतात.

९. प्रभू भोजनामध्ये येशूने बेखमीर भाकर आणि फळांचा रस अर्थात द्राक्षाच्या रसाचा उपयोग केला.

१०. एक ख्रिस्ती होणे आणि ख्रिस्ती होवून जगण्यासाठी आपल्याला पाहिजे की, १) ख्रिस्ताजवळ या, २) त्याच्या सोबत जीवन आरंभ करा, ३) सदैव इतर ख्रिस्ती लोकांसोबत उपासनाव्दारा, आणि ४) दुस—यांची सेवा करण्याचा आरंभ करा.